


सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on











E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


# ‘विकसित भारत’साठी पीएम मोदींचा ५-पॉइंट रोडमॅप; युवाशक्ती, आत्मनिर्भरता अन् महिला आरक्षणावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ नवी दिल्ली–**

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याच्या उद्दिष्टाला केंद्रस्थानी ठेवत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातून सरकारच्या पुढील वाटचालीचा व्यापक आराखडा देशासमोर मांडला. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून देशाला संबोधित करताना मोदी यांनी युवकांसाठी रोजगार व कौशल्यविकास, आत्मनिर्भरतेसाठी ऊर्जा सुरक्षा, प्रशासनाला वेग, उत्पादन-तंत्रज्ञान-निर्यातीला चालना आणि महिला प्रतिनिधित्वासह राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य, अशा पाच प्रमुख दिशांचा पुनरुच्चार केला. हे मोदी यांचे सलग १३वे स्वातंत्र्यदिनाचे भाषण ठरले. मोदी यांच्या भाषणातील सर्वाधिक लक्षवेधी भाग युवकांशी संबंधित होता. विकसित भारताचे सर्वाधिक लाभार्थी आणि त्याचे प्रमुख शिल्पकार देशातील तरुण असतील, असे त्यांनी स्पष्ट केले. स्टार्टअप्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, विमान वाहतूक, ड्रोन, इलेक्ट्रिक वाहने, क्रीडा, जैव-अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला.

पुढील एका वर्षात एक कोटी युवकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य जाहीर करण्यात आले. त्याचबरोबर स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी देशभरात मोफत ऑनलाइन कोचिंगची व्यवस्था उभारण्याची घोषणा करण्यात आली. महागड्या खासगी कोचिंगमुळे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर पडणारा आर्थिक भार कमी करणे हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे मोदी यांनी सांगितले.पाच ते १५ वर्षे वयोगटातील मुलांमधील क्रीडा गुणवत्ता शोधण्यासाठी देशव्यापी टॅलेंट हंट राबवण्याची घोषणाही करण्यात आली. भारताला २०३६च्या ऑलिम्पिकचे यजमानपद मिळवण्याच्या तयारीशी या उपक्रमाची सांगड घालण्यात आली आहे. जागतिक पातळीवरील युद्धे, पुरवठा साखळीतील अडथळे आणि वाढती भू-राजकीय अनिश्चितता लक्षात घेता आत्मनिर्भरता ही केवळ आर्थिक संकल्पना राहिलेली नसून राष्ट्रीय सुरक्षेची गरज बनली असल्याचे मोदी यांनी नमूद केले. तेल, खत, औषधे, तंत्रज्ञान आणि सेमीकंडक्टर यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत परावलंबित्व कमी करण्यावर त्यांनी भर दिला.




ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने भारताने २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जा क्षमता उभारण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. पुढील काळात अणुऊर्जा क्षेत्राचा विस्तार, तेल-गॅस उत्पादनाला चालना आणि सौरऊर्जेची क्षमता वाढवण्यावर सरकारचा भर राहणार असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले. सेमीकंडक्टर उद्योग आणि एआय डेटा सेंटरच्या विस्तारामुळे भविष्यात ऊर्जेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याने ऊर्जा स्वावलंबनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**‘वेग’ हे प्रशासनाचे नवे मापदंड–** सरकारच्या कामकाजात वेग आणण्यावरही मोदी यांनी विशेष भर दिला. पाणीपुरवठा, गॅस जोडण्या, घरकुल, पायाभूत सुविधा, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, रेल्वे, मोबाइल उत्पादन आणि डिजिटल व्यवहार यातील वाढीचा दाखला देत त्यांनी गेल्या काही वर्षांतील कामकाजाच्या गतीचे चित्र मांडले.यापुढील टप्प्यात केवळ योजना जाहीर करण्यापेक्षा निर्णयांची जलद अंमलबजावणी, प्रकल्पांची वेळेत पूर्तता आणि कार्यसंस्कृतीत बदल हा सरकारसमोरील महत्त्वाचा अजेंडा राहणार असल्याचे संकेत भाषणातून मिळाले. ‘अधिकतम प्रशासन, किमान सरकार’ या भूमिकेला आता ‘वेगवान प्रशासन’ची जोड देण्याचा प्रयत्न दिसून आला.

**‘सप्त धारा’तून जागतिक बाजारपेठेवर लक्ष–** आत्मनिर्भर भारत म्हणजे जगापासून आर्थिकदृष्ट्या अलग होणे नव्हे, तर भारतीय उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक बनवणे, असा संदेश मोदी यांनी दिला. एमएसएमई क्षेत्राने मुक्त व्यापार करारांचा लाभ घेत जागतिक बाजारपेठेत विस्तार करावा, असे आवाहन त्यांनी केले.यासाठी मोदी यांनी ‘सप्त धारा’ ही संकल्पना मांडली. उत्पादन, अन्नप्रक्रिया, तंत्रज्ञान व नवोन्मेष, कनेक्टिव्हिटी, सुरक्षा, हरित अर्थव्यवस्था आणि सॉफ्ट पॉवर या सात क्षेत्रांत भारताने जागतिक नेतृत्व मिळवावे, अशी भूमिका त्यांनी मांडली. सेमीकंडक्टर, ६ऋ, संरक्षण उत्पादन, ग्रीन हायड्रोजन, नवीकरणीय ऊर्जा आणि सर्जनशील उद्योगांना या आराखड्यात महत्त्व देण्यात आले आहे.

**महिला आरक्षण आणि राष्ट्रीय सुरक्षा–** भाषणाच्या अखेरीस महिला राजकीय प्रतिनिधित्वाचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’च्या अंमलबजावणीसाठी सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन मोदी यांनी केले. मतदारसंघ पुनर्रचना आणि त्यानंतरच्या जागावाटप प्रक्रियेशी या आरक्षणाची अंमलबजावणी जोडलेली आहे.राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर मोदी यांनी माओवादी हिंसाचाराविरोधातील कारवाईचा उल्लेख केला. ‘दिमागी नक्षल’ या शब्दप्रयोगातून नक्षली विचारसरणीविरोधातही कठोर भूमिका घेण्याचे संकेत त्यांनी दिले. त्याचबरोबर संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेला चालना देत ड्रोन, अँटी-ड्रोन यंत्रणा आणि हायपरसॉनिक संरक्षण तंत्रज्ञानात भारताने जागतिक नेतृत्व मिळवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. एकूणच, मोदी यांच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणातून युवक-केंद्रित विकास, ऊर्जा व तंत्रज्ञानातील स्वावलंबन, वेगवान प्रशासन, जागतिक बाजारपेठेत भारतीय उत्पादनांचा विस्तार आणि महिला प्रतिनिधित्वासह राष्ट्रीय सुरक्षा या पाच दिशांवर केंद्र सरकारचा पुढील भर राहणार असल्याचे स्पष्ट झाले. २०४७च्या विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करताना घोषणांपेक्षा त्यांची प्रभावी आणि वेळेत अंमलबजावणी हेच सरकारसमोरील पुढील मोठे आव्हान ठरणार आहे.

# युवाशक्तीला न्याय देऊ, सर्वाधिक रोजगार निर्माण करू

## स्वातंत्र्य दिनी मुख्यमंत्र्यांचे मोठे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई :** देशभरात आज ८० व्या स्वातंत्र्य दिनाचा उत्साह पाहायला मिळत आहे. मध्यरात्री १२ वाजेनंतर देशातील अनेक ठिकाण ध्वजारोहण करण्यात आले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावर सकाळी ७.३० वाजता ध्वजारोहण केले. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकाळी ९ वाजता मंत्रालयात ध्वजारोहण केले. त्यानंतर राज्यातील पालकमंत्र्यांनी नेमून दिलेल्या ठिकाणी ध्वजारोहण केले. मुख्यमंत्री फडणवीसांनी मंत्रालयात ध्वजारोहण केल्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महाराष्ट्र हे आपल्या देशाचे ग्रोथ इंजिन असून सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्रात आहे, सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात असे म्हणत रोजगाराच्या सर्वाधिक संधी देखील महाराष्ट्रामध्ये निर्माण करून आमच्या युवाशक्तीला न्याय देण्याचा प्रयत्न आपण करत असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी मुख्यमंत्री फडणवीसांनी म्हटले की, विकसित भारताच्या संकल्पनेमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका या महाराष्ट्राची असणार आहे. महाराष्ट्र हे आपल्या देशाचे ग्रोथ इंजिन आहे.

जे देशाच्या विकासातील एक अत्यंत महत्त्वाचे उपकरण म्हणून महाराष्ट्राकडे आपण पाहतो. छत्रपती शिवरायांनी जी शिकवण दिली त्या शिकवणीवर आधारित आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान दिले त्या संविधानाला अनुसरून महाराष्ट्र सातत्याने विकास करत असल्याचे त्यांनी सांगितले. आपण महिला शेतकरी हा कायदा तयार केला आणि पहिल्यांदा देशामध्ये महिलांना शेतकऱ्यांचा दर्जा हा देण्याचा निर्णय घेणार महाराष्ट्र पहिलं राज्य आहे याचा मला अतिशय आनंद असल्याचे ते म्हणाले.

तसेच, आज देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. याहीवर्षी पहिल्या सहामाहीत महाराष्ट्राचा जो आर्थिक विकासाचा दर आता मोजलेला आहे तो जवळपास ८.८ टक्के आहे.

आपण प्रयत्न करतोय की प्रत्येक जिल्हा हा ग्रोथ इंजिन झाला पाहिजे. त्यामध्ये जवळपास १३ जिल्ह्यांनी आपले टार्गेट पूर्ण केले आहे. आणि इतरही जिल्हे त्याच पद्धतीने विकासाकडे अग्रसर आहेत. विकास हा केवळ काही टप्प्यांमध्ये नाही, तर शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी मग गडचिरोली असो पालघर असो किंवा नंदुरबार असो अशा प्रत्येक भागामध्ये विकास पोहोचवण्याचा प्रयत्न आपण करतोय, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# स्वातंत्र्यदिन उत्साहात साजराजलसंधारण, शेतकऱ्यांच्या मदतीवर भर - दादाजी भुसे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती,**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ३०८ कोटी रुपयांची शेतकऱ्यांना मदत करण्यात आली. त्यासोबतच जलसंधारणासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहे. येत्या काळातही जलसंधारण आणि शेतकऱ्यांना मदतीवर भर देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.





स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजवंदनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. भुसे यांनी, जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी 'जलसंधारण अभियान' राबवले जाणार आहे. तसेच, २१ ऑगस्ट रोजी माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येणार आहे. त्यासोबतच काही भागातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना मदत व्हावी, म्हणून कर्जमुक्ती झालेल्या शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यात येत आहे. शिक्षण क्षेत्रातही धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहे. शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर ‘गर्जा महाराष्ट्र माझा’ हे राज्यगीत अनिवार्य करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, यासाठी केंद्रप्रमुख पदांची भरती करण्यात आली आहे, तसेच पवित्र पोर्टलद्वारे ३० हजार शिक्षक भरती प्रक्रिया सुरू आहे. २६ जानेवारी रोजी २ कोटी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामूहिक कवायतीची 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली असल्याचे सांगितले.

जिल्ह्यात पायाभूत सुविधा आणि ग्राम विकासासाठी जिल्हा नियोजनमधून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रामुख्याने पांदण रस्त्यांसाठी निधी देण्यात आला असून यामुळे शेतकऱ्यांचे वहीवाटीचे रस्ते उपलब्ध करून होणार आहे. चिखलदरा हे परिपूर्ण पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी निधी देण्यात येत आहे. येथील स्कायवॉकचे वेगाने पूर्ण करण्यात येत आहे. जिल्ह्याच्या विकासात योगदान देणारे अमरावती विमानतळ विस्तारीकरण, नाईट लँडिंग सुविधा आणि पायलट प्रशिक्षण केंद्र उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. तसेच वस्त्रोद्योग विकासासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगितले.यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, पोलिस उपअधिक्षक तयुब युनुस मुजावर, नागरी हक्क संरक्षण च्या पोलिस अधीक्षक अनिता पाटील, पोलिस निरीक्षक अशोक लांडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक अनिल काळे, पोलिस हवालदार प्रशांत भटकर, त्र्यंबक मनोहर, राजेश पांडे, प्रभाकर बोदडे, हेड कॉन्स्टेबल निलेश अंबर्ते, दिपमाला साळुंखे, अतुल कडू, प्रदिप बद्रे, मिलींद बेलसरे, हरीना नेत्रदान समितीचे मनोज राठी, राजेंद्र वर्मा, रामप्रकाश मिश्रा, मुकेश लोहिया, शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविल्याबद्दल सारांश सारडा, गार्गी कुऱ्हाडे, दिया पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंधारण, व्यसनमुक्ती, पॉश कायदा, साक्षरतेची शपथ घेण्यात आली. तसेच जलसंधारणाच्या लोगोचे अनावरण करण्यात आले.-

# अन्यथा भविष्यात हीच तरुणाई समाजावर ओझे ठरू शकते

# जेन-झी बाबत सरसंघचालक मोहन भागवत यांचे मोठे विधान

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१५नागपूर :**

देशातील तरुणाई ही लोकसंख्यात्मक देणगी आहे. तरुणांना योग्य दिशा आणि संधी दिल्यास देशाला मोठा लाभ होईल; मात्र त्यांचा योग्य प्रकारे उपयोग झाला नाही तर भविष्यात हीच तरुणाई समाजावर ओझे ठरू शकते, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी शनिवारी सांगितले. जेन झी तरुणांशी दहा दिवसांत दुसऱ्यांदा संवाद साधताना भागवत यांनी भविष्यातील पिढ्यांचा विचार करण्याचे आवाहन केले. “आजचे तरुण ३० वर्षांनंतर वृद्ध होतील. त्यामुळे केवळ स्वतःचा विचार न करता पुढील पिढ्यांच्या गरजांचाही विचार केला पाहिजे,” असे त्यांनी सांगितले.

**भारताने विकासाचे निकष स्वतः ठरवावेत –** भारताची तुलना अमेरिका, ऑस्ट्रेलिया, चीन किंवा न्यूझीलंडसारख्या देशांशी करून विकासाचे निकष ठरवू नयेत. भारताची लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती आणि उपलब्ध संसाधने वेगळी आहेत. त्यामुळे देशाच्या परिस्थितीला अनुरूप अशी स्वतंत्र विचारप्रक्रिया आवश्यक आहे, असे भागवत म्हणाले.कॅनडा, अमेरिका किंवा चीनसारख्या मोठ्या भौगोलिक क्षेत्र असलेल्या अथवा मोठ्या संसाधनांचा साठा असलेल्या



देशांची विकासपद्धती भारताला तशीच लागू करता येणार नाही. भारतातील समस्यांचा सखोल अभ्यास करून त्यावर स्वतंत्र उपाययोजना करण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**‘रोजगार म्हणजे केवळ नोकरी नव्हे’**

“तरुणाई ही लोकसंख्यात्मक देणगी आहे. तिला योग्य प्रकारे हाताळले तर देशाला मोठा फायदा होईल; अन्यथा भविष्यात समाजावर त्याचा भार पडू शकतो. तरुण भविष्यात देशाची कमावती शक्ती असतील. रोजगार म्हणजे केवळ नोकरी नव्हे, तर श्रम करणारे हातही त्याचा भाग आहेत. श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे,” असे भागवत यांनी सांगितले. तरुणांनी उद्योजकतेकडे वळावे आणि अडचणींना धैर्याने सामोरे जाऊन यश मिळविण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात मोठा तिरंगा फडकविण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा संदर्भ देत भागवत यांनी राष्ट्रध्वजामागील भावना आणि भारताला अधिक उंचीवर नेण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांचा विचार करण्याचे आवाहन केले. “आपण भारत आहोत. भारताचा स्वाभिमान, प्रतिष्ठा आणि विकासाची स्वतःची संकल्पना आहे.

प्रगतीचे निकषही आपणच ठरविले पाहिजेत. इतर देशांशी तुलना करण्याऐवजी देशासाठी आणि स्वतःसाठी काय आवश्यक आहे, याचा विचार केला पाहिजे,” असे भागवत म्हणाले.

## संपादकीय ......

# हर घर तिरंगा

*आज भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन! ब्रिटिशांच्या वसाहतवादातून आणि गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वातंत्र्यसूर्य भारताच्या नभांगणात अवतरणे, ही जगाच्या इतिहासातील एक अलौकिक आणि परिवर्तनशील घटना म्हणून नोंदवली गेली. असंख्य क्रांतिकारकांनी, स्वातंत्र्यसैनिकांनी, विचारवंतांनी आणि स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनी यासाठी संघर्ष केला, प्राणांची आहुती दिली. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत सलग आठ दशके विविधतेने नटलेल्या देशाला एकसंध ठेवत आणि विकासाचा मार्ग स्वीकारत भारताने लोकशाही अखंडित ठेवली. संविधानाने दिलेले अधिकार आणि स्वातंत्र्याची हमी हे कोणत्याही सुदृढ राष्ट्राचा पाया असतात, ज्यावर देशाची इमारत उभी असते. प्रसिद्ध ब्रिटिश इतिहासकार आर्नोल्ड टायन्बी म्हणतात की, संघर्ष आणि विनाशाच्या छायेत वावरणाऱ्या आजच्या जगाला टिकून राहायचे असेल, तर भारताच्या सहिष्णुतेचा आणि शांततेचा संदेश हा एकमेव मार्ग ठरू शकतो. अनेक भाषा, धर्म आणि संस्कृतींचे लोक शांततेने कसे नांदू शकतात, याचे भारत उत्तम उदाहरण आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही दशकांत भारतासमोर देश उभा करण्याचे आव्हान होते. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेला औद्योगिक आधार देणे, सिंचन आणि वीजनिर्मिती वाढवणे, धरणे आणि कारखाने उभारणे, शिक्षणाच्या सुविधा वाढवणे आणि आरोग्यव्यवस्था उभी करणे, ही कामे टप्प्याटप्प्याने झाली. नियोजनाच्या मार्गाने देशाने विकासाचा पाया घातला.*

*अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी हरित क्रांतीने बळ दिले. त्यानंतर आर्थिक सुधारणांनी भारतीय अर्थव्यवस्थेला नवी दिशा दिली. खासगी उद्योग, परकीय गुंतवणूक, सेवा क्षेत्र आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलला. गेल्या दशकाने या वाटचालीला गतिमानता देत महासत्तेच्या दिशेने प्रवास आरंभला. ज्या इंग्रजांनी भारताला साप-गारुड्यांचा देश म्हणून हिणवले होते आणि भारतीय लोकशाही, स्वातंत्र्य फार काळ टिकणार नाही अशा वल्गना केल्या होत्या, त्या ब्रिटनला मागे सारून भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला. जगातील सर्वाधिक विकास दर असणारा देश म्हणून भारताकडे जग औत्सुक्याने पाहत आहे. आकांक्षावादी विशाल बाजारपेठ, अन्नधान्योत्पादनातील स्वावलंबन, सर्वाधिक तरुण नवोन्मेषी लोकसंख्या, औद्योगिक प्रगती, तंत्रज्ञानातील सामर्थ्य, स्टार्टअप्समधील भरारी, अवकाश संशोधनातील देदीप्यमान यश, हवामान बदलाच्या क्षेत्रातील धवल कार्य, विदेशी गुंतवणूकदारांची पहिली पसंती यांसह शंभरीकडे निघालेल्या भारताची असंख्य बलस्थाने आहेत. दशकभरापूर्वीपर्यंत पश्चिमी प्रगत जगाच्या धोरणांचा अनुनय करणारा भारत आता जागतिक अजेंडा ठरवत आहे.*

*भारताला डावलून जागतिक अर्थकारणाचा, राजकारणाचा विचार करणे आता अशक्य बनले आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनाला अनेक सोनेरी पैलू आहेत. स्वातंत्र्यदिनाचे सर्वांत प्रभावी प्रतीक म्हणजे भारताच्या राष्ट्रध्वज. संविधान सभेने २२ जुलै १९४७ रोजी आजच्या राष्ट्रध्वजाची रचना स्वीकारली. केशरी, पांढरा आणि हिरवा असे तीन रंग आणि मध्यभागी निळ्या रंगाचे अशोकचक्र अशी तिरंगा ध्वजाची रचना असून यातील प्रत्येक घटकाला प्रतीकात्मक अर्थ आहे. अशोकचक्र आपल्याला सतत गतिमानतेचे आणि परिवर्तनाचे महत्त्व सांगत 'थांबला तो संपला' असा संदेश देते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून २०२२ पासून विद्यमान सरकारने 'हर घर तिरंगा' अभियान आरंभले. सरकारी कार्यालये आणि सार्वजनिक संस्थांपुरता मर्यादित राहिलेला ध्वज सामान्य नागरिकाच्या घरापर्यंत पोहोचणे ही या अभियानाची सकारात्मक बाजू आहे. राष्ट्रध्वज आपल्याला नेहमीच कर्तव्यकठोर राहण्याची प्रेरणा देतो. डौलाने फडकणाऱ्या भारतीय राष्ट्रध्वजाकडे आपण अभिमानाने पाहतो तेव्हा नकळत स्वातंत्र्यलढ्याचा संघर्षशील आणि प्रेरणादायी इतिहास आपल्या डोळ्यांसमोरून पुढे सरकत असतो.*

*सर्व भारतीयांना सन्मानाची हमी आणि विकासाची संधी बहाल करणारे भारतीय संविधान आणि राष्ट्रध्वज हे दोन्ही आपल्यासाठी अभिमानाचे विषय आहेत. राष्ट्रध्वजाला सलामी म्हणजे भारताच्या बहुविध संस्कृतीचा सन्मान. जगाच्या विविध भागांत राहणाऱ्या भारतीयांच्या मनातही राष्ट्रध्वजाविषयीचे स्थान तितकेच जिव्हाळ्याचे आहे. ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त यंदा प्रथमच 'सूर्यपथ तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. फिजीपासून अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्कोपर्यंत असलेल्या ५४ भारतीय दूतावासांमधून तिरंग्याच्या छायाचित्रांचे पूर्वेकडून पश्चिमेकडे डिजिटल पद्धतीने प्रेषण केले जाणार आहे. वेगवेगळ्या टाईमझोनमुळे या उपक्रमाला एक आगळी प्रतीकात्मकता प्राप्त झाली आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार होणारी ही साखळी जगभर विखुरलेल्या भारताच्या राजनैतिक उपस्थितीला एका राष्ट्रीय प्रतीकाशी जोडण्याचा प्रयत्न आहे. अलीकडे राष्ट्राच्या सन्मानाशी संबंधित कायद्यात करण्यात आलेल्या बदलामुळे 'वंदे मातरम्'लाही राष्ट्रगीताप्रमाणे कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. याचा पुढील टप्पा म्हणजे ८० वर्षांत प्रथमच यंदा लाल किल्ल्यावर 'वंदे मातरम्' गायले जाणार आहे.*

*बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या लेखणीतून साकारलेले हे गीत स्वातंत्र्यलढ्याच्या काळात राष्ट्रभावनेचे प्रभावी प्रतीक बनले. या प्रतीकाला राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मुख्य सोहळ्याशी जोडण्याचा प्रयत्न स्पृहणीय आहे; पण राष्ट्रध्वजाला सलामी किंवा राष्ट्रीय सणांच्या दिवशी देशभक्तीपर गीतांचे गायन इतका राष्ट्रभक्तीचा संकुचित अर्थ नाही. स्वातंत्र्याचा, संविधानाचा आणि सामूहिक हिताचा आदर करून त्यासाठी आपली जबाबदारी पार पाडणे म्हणजे राष्ट्रप्रेम. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात हीच भावना लाखो सामान्य माणसांना एकत्र घेऊन आली. महात्मा गांधींपासून भगतसिंगांपर्यंत आणि सरदार पटेलांपासून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत सर्वांनी राष्ट्र प्रथम ही भूमिका ठेवून सारे आयुष्य समर्पित केले. त्यागाची ही भावना नसती, तर केवळ राजकीय रणनीतीच्या बळावर ब्रिटिश सत्तेविरुद्ध इतका व्यापक संघर्ष उभाच राहिला नसता. राष्ट्ररक्षण ही केवळ सैन्याची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. देशाच्या प्रगतीत आपला वाटा उचलणे हेच या भावनेचे दैनंदिन रूप आहे. घरावर फडकणाऱ्या राष्ट्रध्वजाने दाखविलेल्या एकतेची, त्यागाची आणि प्रगतीची भावना आपल्या कृतीत उतरविणे हाच स्वातंत्र्यदिनाचा सार्थ संकल्प होय. या संकल्पानुरूप प्रत्येकाचे आचरण हाच विकसित राष्ट्राचा आधार ठरणार आहे. स्वातंत्र्यसैनिकांनी पाहिलेले सोनेरी स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. तिचे काटेकोर पालन करणे, हेच स्वातंत्र्यसूर्याला खरे अभिवादन ठरेल.*

# जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण – उत्कृष्ट कार्यासाठी जिल्ह्यातील विविध अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**

जिल्हाधिकारी कार्यालयात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा अधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

स्वातंत्र्य दिनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात देशप्रेम व उत्साहाचे वातावरण होते. वंदेमातरम् गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम् गीताने झाली. यानंतर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली यावेळी पोलीस बँड पथकाकडून राष्ट्रगीत व महाराष्ट्र सादर झाले.यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय व विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी कर्मचारी व उपस्थिती विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिकांना जिल्हाधिकारी यांनी महिलांचे लैंगीक शोषण प्रतिबंध कायदा, नशामुक्ती, जलसंधारण आणि साक्षरतेची शपथ दिली.

**जिल्हा स्तरावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान**

जिल्हास्तरावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.जिल्हाधिकार्यालयातील निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे यांना उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून गौरविण्यात आले.तिवसा तहसीलदार मयुर कळसे आणि अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन शहारे यांना उत्कृष्ट तहसीलदाराच्या पुरस्काराने गौरविण्यात. धारणी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार राजेश माळी यांना उत्कृष्ट नायब तहसीलदार म्हणून गौरविण्यात.तहसिल कार्यालय, अंजनगाव सुर्जी चे सहायक महसूल अधिकारी राहुल चव्हाण,मोर्शी तहसिल कार्यालययातील मंडळ अधिकारी मेघा खाडे, जिल्हधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक प्रतिक पावडे,तहसिल कर्यालय अंजनगाव सुर्जी चे ग्राम महसूल



अधिकारी मनोज रुमाले,उपविभागीय अधिकारी कार्यालय चांदुर रेल्वेचे लघुलेखक बंटी कावरे,तहसिल कार्यालय, अचलपुर येथील वाहन चालक नंदकिशोर पावडे,अमरावती तहसिल कार्यालयाचे शिपाई मुन्ना तडोला,तहसील कार्यालय येथील धामणगाव रेल्वे महसूल सेवक-कोतवाल नितीन पडधान कोतवाल ,तहसील कार्यालय, भातकुली अंतर्गत पोलीस पाटील प्रशांत वानखडे आणि जिल्हास्तरावर नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विषयक उत्कृष्ट कार्य करणारे शोध व बचाव पथक प्रमुख सचिन धरमरकरयांना उत्कृष्ट कार्यासाठी गौरविण्यात आले.जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचाही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वंदे मातरम आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# तळेगाव ठाकूरच्या जि.प. कन्या शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात

### विद्यार्थिनींच्या कवायतीने वेधले ग्रामस्थांचे लक्ष..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तळेगाव ठाकूर** – स्वातंत्र्याच्या पावन पर्वानिमित्त तळेगाव ठाकूर येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळेत स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत घोषवाक्य स्पर्धा, कवायत संचालन, देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा तसेच स्वातंत्र्य दिनावर आधारित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या आवारात झेंडावंदनाने करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा कावळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माननीय विलास कुबडे यांच्या हस्ते महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रध्वज फडकवून विद्यार्थिनी व उपस्थितांनी राष्ट्रगीतासह देशभक्तीपर वातावरणात स्वातंत्र्य दिन साजरा केला.

यानंतर शाळेतील विद्यार्थिनींनी गावातील चौकात देशभक्तीपर गीतांच्या तालावर कवायतीचे उत्कृष्ट सादरीकरण केले. शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आलेल्या या कवायतीने ग्रामस्थांचे विशेष लक्ष वेधून घेतले. विद्यार्थिनींच्या एकसंध हालचाली, शिस्त आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे उपस्थितांनी भरभरून कौतुक केले.स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या तब्बल ५५ विद्यार्थिनींनी स्वातंत्र्य, देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम या विषयांवर भाषणे सादर केली. विद्यार्थिनींनी स्वातंत्र्यसंग्रामातील थोर स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान तसेच देशाप्रती असलेली आपली जबाबदारी याबाबत विचार मांडले. घोषवाक्य स्पर्धा आणि देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेलाही विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमानंतर विद्यार्थिनींना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास कुबडे, उपाध्यक्ष छाया भोजने, समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, मुख्याध्यापिका वर्षा कावळे, शिक्षकवृंद, पालक वर्ग, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.गावातील चौकात विद्यार्थिनींच्या कवायतीचे सादरीकरण पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थिनींच्या शिस्तबद्ध आणि आकर्षक कवायतीचे ग्रामस्थांनी कौतुक करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये देशप्रेम, शिस्त, आत्मविश्वास आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजण्यास मदत झाली.

# 'इतिहास महाराष्ट्राचा' अंतिम फेरीत अमरावतीचा डंका

### एकल मोठा गट : सायली जुमडे सर्वोत्कृष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती, मुंबईतर्फे दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातील २८ केंद्रावर 'इतिहास महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाच्या रूपाने ऐतिहासिक चरित्रांवर एकपात्री, नाट्यछटा, स्वगत, नाटूकले सादरीकरण महोत्सव साजरा केला जातो. यावर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य यावर एकपात्री, नाट्यछटा, स्वगत, नाटूकले सादरीकरण महोत्सव स्थानिक सोमेश्वर पुसतकर सभागृह येथे बाल नाट्य दिनानिमित्य साजरा करण्यात आला होता. त्यातील एकल मोठा गट यामध्ये सायली जुमडे सर्वोत्कृष्ट ठरून अंतिम फेरीत दाखल झाली होती. यामध्ये २५ केंद्रातून सर्वोत्कृष्ट स्पर्धक महोत्सवात दाखल झाले होते. सायली जुमडे हिने एकल मोठा गट यामध्ये सर्वोत्कृष्ट पारितोषिक ३ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र प्राप्त केले.




कला आणि इतिहासाचा अप्रतिम संगम असलेल्या या महाअंतिम फेरीत आपल्या दमदार अभिनयाने बालकलावंतांनी उपस्थितांचे मन जिंकले. ख्यातनाम अभिनेते व तज्ज्ञ परीक्षक संजय हळदीकर (कोल्हापूर), प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे (मुंबई) आणि अभिनेते दिगंबर नाईक (मुंबई) यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. सायली जुमडे हिला सिने अभिनेत्री व बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती, मुंबईच्या अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. अमरावती जिल्हा शाखेचे पदाधिकारी मंगेश बक्षी, विशाल रमेश तराळ, संजीवनी पुरोहित, भूषण उंबरकर, स्वाती तराळ, स्वेहा तराळ यांनी सायलीचे विशेष अभिनंदन केले. सर्व स्तरावरून सायलीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अतितीव्र लाईटचा वापर करणाऱ्या ४१७ वाहनांवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती–** रात्रीच्या वेळी वाहन चालविताना वाहनांच्या अतितीव्र व डोळे दिपवणारा प्रकाशाचे लाइट वापरणाऱ्या २९९ वाहनांवर ग्रामिण पोलिसांनी ३१ ठाण्याच्या हद्दीत ऑपरेशन कवच अंतर्गत कारवाई केली आहे. त्यातील ११८ अशा एकूण ४१७ वाहनांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. अशा प्रकारच्या लाईटचा वापर केल्याने रात्रीच्या वेळी वाहन चालविताना वाहनचालकांच्या दृष्टीवर विपरीत परिणाम होऊन अपघात होण्याची शक्यता वाढते. तसेच इतर वाहनचालक व सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होऊन गैरसोय निर्माण होते. या पार्श्वभूमिवर ऑपरेशन कवच अंतर्गत जिल्ह्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अशा वाहनचालकांविरुद्ध विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. त्यात १३ ऑगस्टला केलेल्या ३१ ठाण्याच्या हद्दीतील हायबीम, अतितीव्र प्रकाशाचे,




स्पॉट लाइट, सर्च लाइट संदर्भात २०० वाहनांवर कारवाई केली. वाहतूक पोलिस व संबंधित ठेवण्यांची एकूण जवळपास ४१७ वाहनांवर कारवाई करून २ लाख १० हजारांचा दंड आकारण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली भोये, यांच्या मार्गदर्शनता ठाणेदार व जिल्हा वाहतूक शाखेने ही कारवाई केली.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त ऐतिहासिक जवाहर गेट येथे भव्य ध्वजारोहण सोहळा

### हजारो देशभक्त नागरिकांच्या उपस्थितीत राष्ट्रभक्ती, सामाजिक एकता आणि ऐतिहासिक परंपरेचा जागर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी आणि विलास इंगोले मित्रपरिवारा च्या वतीने देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ऐतिहासिक जवाहर गेट, अमरावती येथे आज सकाळी ९.०० वाजता भव्य ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हजारो देशभक्त नागरिक, काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी व विद्यमान लोकप्रतिनिधी, युवक, महिला, माजी सैनिक तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींच्या उत्स्फूर्त उपस्थितीने संपूर्ण परिसर राष्ट्रभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.या भव्य सोहळ्यास मा. खासदार बळवंतभाऊ वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत,मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,प्रदेश सचिव हाजी नजीर खान बी.के., युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष निलेश गुहे,युवक काँग्रेस अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, एन.एस.यू.आय.शहराध्यक्ष स्वराज पोटे यांच्यासह सेवादल विभाग,माजी सैनिक, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.यावर्षी स्वातंत्र्य दिनाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे ऐतिहासिक जवाहर गेटची करण्यात आलेली भव्य तिरंगा सजावट.जवाहर गेटपासून इतवारा बाजार ते अंबादेवी परिसरापर्यंत तिरंग्याच्या रंगांनी परिसर सजविण्यात आला होता.आकर्षक




विद्युत रोषणाई,स्वातंत्र्यसंग्रामातील थोर स्वातंत्र्यसैनिक तसेच काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या कार्याला उजाळा देणारे फ्लेक्स यामुळे संपूर्ण परिसराला ऐतिहासिक आणि राष्ट्रभक्तीपूर्ण स्वरूप प्राप्त झाले होते.

अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे सर्व ज्येष्ठ नेते,पदाधिकारी,माजी व विद्यमान लोकप्रतिनिधी, नगरसेवक-नगरसेविका, फ्रंटल ऑर्गनायझेशन चे पदाधिकारी तसेच युवक काँग्रेस, एन.एस.यू.आय., महिला काँग्रेस, सेवादल, ओबीसी, एससी, एसटी, अल्पसंख्याक विभाग, सोशल मीडिया विभाग आणि विविध सेल व विभागांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आपल्या संपूर्ण कार्यकारिणीसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमरावती शहरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त पणे सहभाग घेत हा राष्ट्रीय उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी खासदार बळवंतभाऊ वानखडे यांनी उपस्थित नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, अमरावतीच्या ऐतिहासिक परंपरेला जपत जवाहर गेट येथे एवढ्या मोठ्या प्रमाणावर पारंपरिक,सामाजिक आणि ऐतिहासिक स्वरूपाचा ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा अमरावती शहर काँग्रेस कमिटीने जपली आहे. जवाहर गेटच्या ऐतिहासिक महत्त्वाला साजेसा भव्य सोहळा आयोजित केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी सर्वप्रथम हजारोच्या संख्येने उपस्थित राहिलेल्या अमरावतीकरांचे आभार मानले.देशात सध्या सुरू असलेल्या असंवैधानिक घडामोडींविरोधात लोकशाही, संविधान आणि जनतेच्या अधिकारांच्या रक्षणासाठी संघर्ष उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.आज स्वातंत्र्य दिनाच्या पवित्र पर्वावर अमरावतीच्या भूमीतून लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणाच्या लढ्याला नवी दिशा देण्याचा संकल्प करूया, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.ऐतिहासिक जवाहर गेट परिसरात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत झालेला हा ध्वजारोहण सोहळा केवळ स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम न राहता राष्ट्रभक्ती, लोकशाही, संविधान, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लीम ऐक्याचा संदेश देणारा ऐतिहासिक सोहळा ठरला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढे यावे - आ. प्रविण पोटे पाटील

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती-**
देशभक्तीच्या उत्साहपूर्ण वातावरणात पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. तिरंग्याच्या रंगांनी सजलेल्या संपूर्ण कॅम्पसमध्ये स्वातंत्र्य दिनाचा उत्साह पाहायला मिळाला. संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, एड. प्रविण मोहोड, कपिल आंडे, प्रकाश पुंड, सचिन वानखडे यांच्यासह संस्थेतील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, डीन, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आ. प्रविण पोटे पाटील यांनी तरुण पिढीने राष्ट्रभक्ती, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे स्मरण ठेवून अमली पदार्थमुक्त भारत निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्याच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान देत विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.



यानंतर पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, भाषणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारातून स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारकांचे शौर्य, त्याग आणि बलिदानाला अभिवादन करण्यात आले. विविधतेत एकता, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीचा संदेश या सादरीकरणातून प्रभावीपणे देण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या विविध कलाविष्कारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. त्यामुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीचा उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी देशाच्या प्रगतीसाठी आपापल्या क्षेत्रातून योगदान देण्याची शपथ घेतली. 'वंदे मातरम्!' आणि 'जय हिंद!'च्या घोषणांनी स्वातंत्र्य दिनाचा उत्सव देशभक्तीपूर्ण वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भारतरत्न द्या

## आमदार राजेश वानखडे यांची अमित शाह यांच्याकडे आग्रही मागणी

### तिवसा मतदारसंघासह अमरावती जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण विकास प्रकल्पांवरही केंद्रीय गृहमंत्र्यांशी सविस्तर चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली-**
ग्रामविकासचे प्रणेता वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, या मागणीसह तिवसा विधानसभा मतदारसंघ व अमरावती जिल्ह्यातील विविध महत्त्वपूर्ण विकास प्रकल्पांच्या अनुषंगाने आमदार राजेश वानखडे यांनी श्री.संदीपजी सायरे यांचे सह केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांची आज नवी दिल्ली येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामविकास, समाजप्रबोधन, राष्ट्रभक्ती, व्यसनमुक्ती, स्वच्छता आणि सामाजिक एकोपा यासाठी केलेले कार्य राष्ट्रीय पातळीवर अतुलनीय आहे. त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा सन्मान म्हणून त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' प्रदान करण्याची मागणी आमदार वानखडे यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांकडे आग्रहीपणे मांडली.यावेळी नांदगाव पेठ एमआयडीसी येथील केंद्र शासनाच्या अंगीकृत उपक्रमातील भारत डायनामिक्स लिमिटेड (इऊॾ) या बहुप्रतिक्षित मिसाईल निर्मिती प्रकल्पाच्या रखडलेल्या कामाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. सन २०१२ पासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाला तातडीने गती मिळावी आणि प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू व्हावी, अशी मागणी आमदार वानखडे यांनी केली. या प्रकल्पामुळे अमरावती जिल्ह्यात रोजगारनिर्मिती, औद्योगिक विकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते, असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.



जिल्ह्यात सैनिकी स्कूल* अमरावती हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे विभागीय मुख्यालय असूनही या परिसरात युवकांना सैनिकी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारी सैनिक शाळा नसल्याचा मुद्दा आमदार वानखडे यांनी मांडला. तिवसा विधानसभा मतदारसंघात राज्य शासनाच्या सहभागातून केंद्रीय सैनिक स्कूल सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.तसेच ग्रामीण भागातील बूथस्तरावरील कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांना अतिरिक्त उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, यासाठी राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या सहकार्याने सहकारी डेअरी प्रकल्प उभारण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. तालुकास्तरीय कॉमन फॅसिलिटी सेंटरशी या प्रकल्पाचा समन्वय साधून, केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून नाबार्डच्या अर्थसहाय्याने तिवसा विधानसभा मतदारसंघात हा पथदर्शी (पायलट) प्रकल्प राबविण्यास मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी ही करण्यात आली.

केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांनी दिलेल्या वेळेबद्दल आणि भेटीची संधी दिल्याबद्दल आमदार राजेश वानखडे यांनी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले. भेटीदरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना 'भारतरत्न' देण्याच्या मागणीसह विकास प्रकल्पांवर सकारात्मक व सखोल चर्चा झाली. तिवसा मतदारसंघासह अमरावती जिल्ह्यातील प्रस्तावित विकास प्रकल्पांना निश्चितच गती मिळेल, असा विश्वास आमदार राजेश वानखडे यांनी व्यक्त केला.

# पाकिस्तानचे ५ तुकडे होणार

## खा. डॉ. अनिल बोंडे यांचा थेट हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**
पाकिस्तान तेरे तुकडे होंगे... इन्शाअल्लाह, इन्शाअल्लाह! आणि जय श्रीराम, जय श्रीराम! भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी पाकिस्तानवर निशाणा साधत थेट इशारा दिला आहे.



जेव्हा दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (गछण) 'भारत तेरे तुकडे होंगे'च्या घोषणा दिल्या जात होत्या, त्याला जोरदार प्रत्युत्तर देत खा. बोंडे यांनी आता पाकिस्तानचे पाच तुकडे होणार असा मोठा दावा केला आहे...खा. बोंडे म्हणाले की, निरपराध महिलांवर केलेले अत्याचार आणि गोहत्येचा शाप आता पाकिस्तानला भोगावे लागत आहे. याच पापामुळे भूतकाळात पाकिस्तानचे दोन तुकडे होऊन बांगलादेशची निर्मिती झाली, तर बलोचिस्तानने आधीच स्वत:ला स्वतंत्र घोषित केले आहे... पुढे बोलताना बोंडे म्हणाले की, आता पाकिस्तानच्या नाशाची वेळ जवळ आली असून त्याचे पाच भाग होणार आहेत-बलुचिस्तान, पख्तुनिस्तान, सिंध, काश्मीर आणि पंजाब! अमरावतीत खा. बोंडे यांच्या या वक्तव्यामुळे आणि दिलेल्या घोषणांमुळे राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे..

# स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी रांगोळीच्या माध्यमातून थोर महापुरुषांची रांगोळी साकारत दिली मानवंदना





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**
अमरावतीत स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर रांगोळी चित्रातून स्वातंत्र्यवीरांना अनोखी मानवंदना अर्पण केली जात आहे. पीपल्स कला मंच, चांदूर रेल्वे आणि शिक्षण विभाग पंचायत समिती भातकुली यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते २० ऑगस्ट दरम्यान रांगोळी व्यक्तीचित्र प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

जगप्रसिद्ध रांगोळी चित्रकार प्रमोद आर्वी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली २७ कलावंतांनि आज स्वातंत्र्य दीना निमित्य सलग १७ तास महापुरुषांच्या रांगोळी साकारल्या आहे,यामध्ये महात्मा गांधी, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या स्वातंत्र्यवीरांची आकर्षक रांगोळी चित्रे साकारली जात आहेत.

विशेष म्हणजे ही कार्यशाळा पूर्णतः निशुल्क असून, रांगोळी कलेतून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. १८ ऑगस्ट रोजी या कलाकृतींचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार असून, अमरावतीतील कलाप्रेमींना ही अनोखी कला जवळून पाहण्याची संधी मिळणार आहे.

# तीन वर्षांपासून पाण्याच्या टाकीचे खांब उभे

## कामापूरवासींना 'हर घर नल से जल'ची प्रतीक्षा, जलजीवन मिशनच्या कामावर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५मेळघाट जामली-** कामापूर गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याची टाकी उभारण्यासाठी तीन वर्षांपूर्वी बांधकाम सुरू करण्यात आले. मात्र, आजही टाकीचे केवळ खांब उभे असून प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी असलेल्या 'हर घर नल से जल' योजनेचा लाभ कामापूरवासींना कधी मिळणार, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. गावातील जुनी पाण्याची टाकी व जलवाहिनी जीर्ण झाली असून, त्यातून होणारा अपुरा पाणीपुरवठा आणि वारंवार वीजपुरवठ्यात येणाऱ्या अडचणींमुळे ग्रामस्थ त्रस्त आहेत. नवीन जलजीवन मिशनचे काम पूर्ण होऊन घराघरांत नळाद्वारे पाणी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तीन वर्षांचा कालावधी उलटूनही काम रखडल्याने ग्रामस्थांची पाण्यासाठीची भटकंती कायम आहे. आमदार, खासदार तसेच विधान परिषद सदस्य बच्चू कडू यांच्या आढावा बैठकीतही ग्रामस्थांनी कामापूरच्या पाणीप्रश्नाचा मुद्दा उपस्थित केला होता.



संबंधित अधिकाऱ्यांनी काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले, मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. जलजीवन मिशनचे उपकार्यकारी अभियंता सतीश खाटकर हे प्रत्येक आढावा सभेत काम ७५ टक्के पूर्ण झाले असून, उर्वरित काम महिनाभरात पूर्ण करू, असे सांगत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. मात्र, वारंवारच्या आश्वासनानंतरही काम पूर्ण होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढली आहे. जलजीवन मिशनच्या कामाचा प्रत्यक्ष आढावा घेऊन रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे, जुनी जलवाहिनी व पाण्याच्या टाकीची समस्या दूर करावी आणि कामापूर गावाला नियमित नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी सरपंच चारखू राजाराम भुसूम तसेच सामाजिक कार्यकर्ता किसन अखंडेसह ग्रामस्थांनी केली आहे.

# सेंट्रल जेलच्या बॅरेक पुन्हा कुस्तीचा आखाडा

## कैद्यांच्या दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी, २ जखमी

**विदर्भा प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती -**
मध्यवर्ती कारागृह नेहमीच चर्चेचा विषय असते, कारण कारागृहात सतत नवनवीन प्रकार घडत असतात. अशातच गुरुवारी रात्री, एक बॅरेक अचानक कुस्तीच्या आखाड्यात रूपांतरित झाले. कैद्यांच्या दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या घटनेदरम्यान, त्यांनी पाण्याने भरलेल्या बादल्यांनी एकमेकांच्या डोक्यावर प्रहार केले आणि एकमेकांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. काही कैद्यांच्या डोक्याला आणि चेहऱ्याला दुखापत झाली. दोन गंभीर जखमी कैद्यांना पुढील उपचारांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्राप्त माहितीनुसार रात्री ८ वाजण्याच्या सुमारास, नवीन बॅरेकमधील बॅरेक क्रमांक १३ मध्ये कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी कैद्यांच्या दोन गटांमध्ये आरडाओरडा आणि मारामारीचा आवाज ऐकला. कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी एका गटातील कैदी दुसऱ्या गटातील कैद्यांशी भांडताना पाहिले. पाण्याने भरलेल्या बादलीने डोक्यात मारून गंभीर दुखापत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. सर्कल ऑफिसर गणेश भोपले यांना वॉकी-टॉकीद्वारे या घटनेची तात्काळ माहिती देण्यात आली. त्यानंतर संबंधित

अधिकारी आणि सर्कल स्टाफ घटनास्थळी पोहोचले. दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी सुरू होती. अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, स्टाफने बॅरेक्सचे कुलूप उघडून हस्तक्षेप केला आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.



**दोन कैद्यांना रुग्णालयात पाठवले**

गोपाल शंकर कापसे आणि उमेश राजू पवार यांना या हाणामारीत डोक्याला आणि चेहऱ्याला दुखापत झाली. वैद्यकीय तपासणीत जखमांसोबत चावल्याच्या खुणा आढळून आल्या. जेल मेडिकल ऑफिसर डॉ. राजिक यांनी तपासणी आणि उपचार केले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी त्यांना तुरुंग कर्मचाऱ्यांच्या संरक्षणाखाली जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले.

**हाणामारी सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद**

या घटनेनंतर, तुरुंग प्रशासनाने बॅरेक्समध्ये लावलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेजमध्ये दोन्ही गटांतील कैदी एकमेकांशी भांडताना दिसत होते. या आधारावर, तुरुंग प्रशासनाने संबंधित कैद्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची विनंती करत पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली.

तीन कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल तुरुंग प्रशासनाचे कर्मचारी अक्षय गायकवाड यांच्या तक्रारीच्या आधारे फ्रेजरपुरा पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, खटला सुरू असलेले कैदी वैभव बाळासाहेब इक्कर (२६), अनिकेत जगदीश बडोदे (२७) आणि राहुल अनुज उईके यांच्यावर हल्ला आणि तुरुंगाच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे. या घटनेनंतर तुरुंग प्रशासनाने आपली सुरक्षा दक्षताही वाढवली आहे. पोलीस आता सीसीटीव्ही फुटेज, वैद्यकीय अहवाल आणि संबंधित कैद्यांच्या जबाबांच्या आधारे या घटनेचा तपास करत आहेत.

# महानगरपालिकेमध्ये स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## गुणवंत कर्मचा-यांचा सत्कार, अमरावतीकरांना मालमत्ता कराच्या शास्तीवर मोठी सवलत; महापौर श्रीचंद तेजवानी यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**
अमरावती महानगरपालिका तर्फे स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार दिनांक १५ ऑगस्ट,२०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आला. मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते महानगरपालिका प्रांगणात स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिनानिमित्य अमरावती महानगरपालिका तर्फे गुणवंत सफाई कामगार श्रीमती निलम शैलेंद्रसिंग चव्हाण, श्री. अमर सुरेश जावे, श्रीमती कोमल विनोद गोहर, श्री.गणेश संजय चावरे, श्रीमती इंदु सुरेश चव्हाण, श्री.राजकुमार बंडु पासरे, श्रीमती उमा समुद्रे, श्री.नरेंद्र डुलगज, श्रीमती गीता बागडे, श्री. गणेश सांडे या कामगारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हर घर तिरंगा उपक्रमातंर्गत सर्व उपस्थितांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली.

यावेळी मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांनी स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिनाच्या मंगलमय प्रसंगी, अमरावतीच्या जनतेला व उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या. आजचा दिवस केवळ ध्वजारोहणाचा दिवस नाही, तर हा दिवस आहे आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हजारो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना कृतज्ञतेने स्मरण करण्याचा.

अमरावती महानगरपालिका आज आपल्या ४३ व्या वर्धापन दिनाचा प्रवास पूर्ण करून नव्या दिशेने वाटचाल करत आहे. या ४३ वर्षांच्या प्रवासात अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि लाखो नागरिकांनी





अमरावतीच्या विकासासाठी योगदान दिले आहे. आज या विकासाचा वेग आणखी वाढविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. नागरिकांच्या जीवनाशी सर्वाधिक जवळचा विषय म्हणजे पाणी आणि स्वच्छता. अमरावतीच्या भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पाणीपुरवठ्याचे जाळे मजबूत करण्याचे काम सुरू आहे. अमृत-२ अंतर्गत सुमारे ९८५ कोटी ४९ लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. उर्ध्व वर्धा धरणातून भविष्यातील अमरावतीची तहान भागविण्याच्या दिशेने हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. त्याचबरोबर 'स्वच्छ अमरावती, सुंदर अमरावती' या संकल्पनेतून घरोघरी कचरा संकलन, घनकचरा व्यवस्थापन, चठक्र प्रकल्प आणि भूयारी गटार योजनेसारखी कामे पुढे जात आहेत. सुकळी डेपोवरील कचऱ्याचे डोंगर ही एकेकाळची मोठी समस्या होती. मात्र बायोमायनिंग आणि आधुनिक घनकचरा व्यवस्थापनाच्या माध्यमातून त्या समस्येवर मार्ग काढण्याचे काम झाले आहे. शिक्षण हे शहराच्या भविष्याची खरी गुंतवणूक आहे. महानगरपालिकेच्या ६३ शाळांमधील ११ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना डिजिटल बोर्ड, संगणक प्रयोगशाळा आणि आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आज अमरावती डिजिटल परिवर्तनाच्या दिशेनेही वेगाने पुढे जात आहे. चू-गीर्रींळ प, ऑनलाइन सेवा, ई-टॅक्स, ऑनलाइन व्हिजिटर पास, सॅटेलाईट मॅपिंग यांसारख्या सुविधांमुळे प्रशासन आणि नागरिकांमधील अंतर कमी होत आहे. पारदर्शक प्रशासन, गतिमान सेवा आणि नागरिककेंद्री कारभार हीच भविष्यातील महानगरपालिकेची ओळख असली पाहिजे.

शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सिमेंट रस्ते, चौकांचे सौंदर्यीकरण, छत्री तलाव आणि वडाळी तलावाचे नूतनीकरण, ऐतिहासिक परकोटाचे जतन आणि शिवटेकडीवरील भव्य शिवसृष्टी अशा विविध प्रकल्पांमधून अमरावतीला नवी ओळख देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

अमरावतीला महाराष्ट्रातील एक स्वच्छ, सुंदर, हरित, आधुनिक आणि विकासाच्या बाबतीत आदर्श शहर बनविण्याचा संकल्प आपण सर्वांनी करूया.

यावेळी स्वातंत्र्य दिनाच्या ७९ वा वर्धापन दिनानिमित्त शिक्षक विजय खंडारे यांनी देशभक्तीपर राष्ट्रगीत व राज्यगीत सादरीकरण केले.

या कार्यक्रमाचे बॅन्ड पथकाचे संचालन व सुत्रसंचालन विजयकुमार खंडारे, मो. हाफिजखान, एन.बी. सोनवणे सर यांनी केले.

या कार्यक्रमामध्ये महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, मा.आयुक्त यांच्या आई श्रीमती शर्मिला गोंदावले, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता डॉ.राजेंद्र तायडे, झोन सभापती स्वाती कुलकर्णी, झोन सभापती इस्माईल लालुवाले, शिक्षण समिती सभापती प्रीती रेवणे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, उपसभापती सुमती ढोके, महिला व बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे, विधी समिती उपसभापती डॉ.मधुरा कहाळे, नगरसेवक आशिष अतकरे, मिलींद चिमोटे, संजय नरवणे, मिलींद बांबल, प्रमोद महल्ले, मनिष बजाज, सचिन वैद्य, प्रशांत वानखडे, महेश मुलचंदानी, सैय्यद राशद अली सै. शौकत अली, संजय तिरथकर, सै. मुनव्वर अली, नगरसेविका सुनिता भेले, ललिता रतावा, पद्मजा कौंडण्य, लविणा हर्षे, अर्चना पाटील नंदा सावदे, अर्चना पांडे, विद्या माटे, स्मिता सुर्यवंशी, शाह बीबी बतुल ताहेर, राजु कुरील, सुरेश रतावा, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी शिल्पा पवार, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या वेशभुषेत सर्जेराव गलपट यावेळी उपस्थित होते.

# १० फूट पाण्याखाली तिरंग्याला सलामी

## अमरावतीच्या पोलीस शिपायाची अनोखी देशभक्ती

### १ मिनिट १६ सेकंद श्वास रोखून तिरंग्याला दिली मानवंदना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती :** स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात तिरंग्याप्रती आदर आणि देशभक्तीची भावना व्यक्त केली जात असताना अमरावतीतील पोलीस शिपायाने देशभक्तीचा अनोखा आविष्कार साकारला. करण्यात आले. तिरंगा ध्वजासह पाण्याखाली सायकल चालवून त्यांनी राष्ट्रध्वजाला अभिवादन केले. या उपक्रमादरम्यान त्यांनी कृत्रिम ऑक्सिजन किंवा श्वसनासाठी कोणत्याही उपकरणाचा वापर केला नाही .अमरावती येथील जोग

#### डीसीपी प्रांजलि सोनवणे यांच्याकडून कौतुक

अमरावती पोलीस विभागाच्या डीसीपी प्रांजलि सोनवणे यांनी प्रवीण आखरे यांच्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले. पाण्याखाली सायकल चालवणे हेच मोठे आव्हान असून, त्यात कोणत्याही ऑक्सिजन सिलिंडरचा वापर न करता श्वास रोखून हा उपक्रम पूर्ण करणे निश्चितच कौशल्याचे काम असल्याचे त्यांनी नमूद केले.प्रवीण आखरे यांनी सातत्यपूर्ण सराव, योगाभ्यास आणि विशेष कौशल्याच्या माध्यमातून हे शक्य करून दाखवले असून, त्यांच्या कामगिरीचा अमरावती पोलीस दलाला अभिमान असल्याचेही डीसीपी सोनवणे यांनी सांगितले. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने तिरंग्याप्रती आदर आणि देशभक्तीची भावना अशा अनोख्या पद्धतीने व्यक्त करणे निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोलीस अंमलदार प्रवीण दादाराव आखरे यांनी सुमारे १० फूट पाण्याखाली उतरून तिरंग्याला मानवंदना दिली. विशेष म्हणजे त्यांनी पाण्याखाली तब्बल २५ मीटर सायकल चालवत १ मिनिट १६ सेकंद श्वास रोखून हा अनोखा उपक्रम पूर्ण केला.केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासनाच्या 'हर घर तिरंगा' अभियानाच्या अनुषंगाने १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त अमरावती शहरातील पोलीस जलतरण केंद्रात हे प्रात्यक्षिक सादर स्टेडियम परिसरातील पोलीस विभागाच्या जलतरण तलावात प्रवीण आखरे यांनी हे प्रात्यक्षिक सादर केले. त्यासाठी विशेष पद्धतीने तयार केलेल्या सायकलचा वापर करण्यात आला. सायकलवर तिरंगा ध्वज लावण्यात आला होता. तिरंगा सोबत घेऊनच त्यांनी पाण्याच्या तळाशी सायकल चालवत राष्ट्रध्वजाप्रती आदर व्यक्त केला.पाण्याखाली सायकल चालवणे हे जमिनीवर सायकल चालवण्यापेक्षा पूर्णपणे वेगळे आणि आव्हानात्मक आहे. सायकल पाण्यावर तरंगण्याची शक्यता असल्याने ती पाण्याच्या तळाशी स्थिर ठेवणे हे मोठे आव्हान होते. हे आव्हान लक्षात घेऊन सायकलमध्ये विशेष तांत्रिक बदल करण्यात आले.

विशेष सायकल तयार करण्यात प्रवीण आखरे यांचे मित्र तसेच सायकल मेकॅनिक महेंद्र जडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सायकलच्या फ्रेममध्ये अशा प्रकारे बदल करण्यात आले की, त्यामध्ये पाणी प्रवेश करू शकेल. त्यामुळे सायकलचे वजन वाढून ती पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगण्याऐवजी तळाशी राहण्यास मदत झाली.सायकलच्या पुढील बाजूस ट्यूबलेस टायर बसवण्यात आला, तर मागील बाजूस वेगळ्या प्रकारचा टायर वापरण्यात आला. सायकलचा समतोल राखण्यासाठी मागील बाजूस तसेच दोन्ही बाजूंना लहान मुलांच्या सायकलींना लावण्यात येणाऱ्या अतिरिक्त चाकांसारखी सपोर्ट व्यवस्था करण्यात आली. या बदलांमुळे पाण्याखाली सायकल नियंत्रित करणे शक्य झाले.

#### आज स्वातंत्र्यदिनी झाला विशेष सत्कार

दरम्यान, १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते पोलीस शिपाई प्रवीण आखरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला आहे. यावेळी त्यांना मेडल, शाल आणि श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.तिरंग्याला अनोख्या पद्धतीने मानवंदना देत देशभक्तीची भावना व्यक्त करणाऱ्या त्यांच्या या उपक्रमाची दखल घेत हा सन्मान केला गेला आहे.वर्दीसोबत देशभक्तीचा अनोखा अंदाज एक तिरंगा, एक सलामी आणि मानवंदनेची पद्धत मात्र अनोखी. सुमारे १० फूट पाण्याखाली २५ मीटर सायकल चालवत आणि १ मिनिट १६ सेकंद श्वास रोखून प्रवीण आखरे यांनी राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना दिली.त्यांचा हा उपक्रम केवळ पाण्याखाली सायकल चालविण्याचे कौशल्य नसून, वर्दीसोबत असलेली देशभक्ती, सातत्यपूर्ण मेहनत आणि तिरंग्याप्रती असलेला आदर यांची अनोखी अभिव्यक्ती ठरली आहे. अमरावती पोलीस दलातील या अनोख्या उपक्रमाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले असून, नव्या पिढीला राष्ट्रप्रेम आणि तिरंग्याचा सन्मान करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला आहे.



सुमारे १० फूट खोल पाण्यात उतरून प्रवीण आखरे यांनी श्वास रोखला आणि तिरंगा घेऊन सायकल चालवण्यास सुरुवात केली. त्यांनी २५ मीटर अंतर यशस्वीपणे पार केले. या संपूर्ण उपक्रमादरम्यान त्यांनी तब्बल १ मिनिट १६ सेकंद श्वास रोखून ठेवला.पाण्याखाली सायकलचा समतोल राखण्यासोबतच तिरंगा योग्य स्थितीत ठेवणे हेही त्यांच्यासाठी आव्हान होते. मात्र, सातत्यपूर्ण सराव, शारीरिक तंदुरुस्ती आणि पाण्यातील कौशल्याच्या जोरावर त्यांनी हे प्रात्यक्षिक यशस्वी करून दाखवले.

प्रवीण आखरे यांना पाण्याखाली विविध योगासने करण्याचा अनुभव आहे. दीर्घकाळ श्वास रोखून ठेवण्याच्या सरावामुळे आणि पाण्याखालील कौशल्यामुळे त्यांनी यापूर्वीही विविध उपक्रम साकारले आहेत. त्यांच्या या कौशल्याची दखल घेत त्यांना यापूर्वी पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात आले आहे.याच अनुभवाच्या आधारे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने तिरंग्याला काहीतरी वेगळ्या पद्धतीने मानवंदना देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. तिरंग्याप्रती आदर व्यक्त करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असू शकते. देशप्रेमाची भावना कृतीतून व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम केल्याचे प्रवीण आखरे यांनी सांगितले.

# हिंगणघाटमध्ये ट्रॅव्हल्सच्या धडकेत तीन मुलींचा मृत्यू




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५वर्धा–** स्वातंत्र्य दिनाचा उत्साह सुरू असतानाच हिंगणघाट शहरावर काळाने घाला घातला. शहरातील आंबेडकर शाळेजवळ शुक्रवारी झालेल्या भीषण अपघातात तीन शाळकरी मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला. स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आटोपून दुचाकीने घरी जात असताना मागून आलेल्या भरधाव ट्रॅव्हल्सने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या घटनेने हिंगणघाट शहरासह संपूर्ण परिसर हादरला असून, मृत मुलींच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेत आयोजित कार्यक्रम आटोपल्यानंतर तिन्ही मुली दुचाकीने जात होत्या. आंबेडकर शाळेजवळ त्या मार्गावरून जात असताना मागून आलेल्या ट्रॅव्हल्सने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की तिन्ही मुली गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत जखमी मुलींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान तिघींचाही मृत्यू झाला.या अपघातात समृद्धी रूपक धामसे (१५), आरुही राजू चवरे (१७) आणि मिसबा जावेद शेख (१७) या तीन निष्पाप मुलींना आपला जीव गमवावा लागला. तिन्ही मुलींच्या अकाली निधनाची वार्ता परिसरात पसरताच शोककळा पसरली. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी देशभरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण असताना हिंगणघाटमध्ये मात्र तीन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला.घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. ट्रॅव्हल्स चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अपघात नेमका कसा घडला, वाहनाचा वेग किती होता आणि चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाला का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. अपघातातील वाहन ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आहे.दरम्यान, या घटनेमुळे हिंगणघाट शहरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरातून आणि प्रमुख मार्गांवरून धावणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स व अवजड वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने ये–जा करीत असलेल्या परिसरात वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे, तसेच भरधाव वाहनांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.तीन कोवळ्या जीवांचा अपघाती मृत्यू ही केवळ त्यांच्या कुटुंबीयांचीच नव्हे, तर संपूर्ण समाजाची हानी आहे. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने हिंगणघाटकरांच्या आनंदावर विरजण पडले असून, निष्पाप मुलींच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पालकांनी पाल्यांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे –शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती,** विद्यार्थी भविष्यातील देशाचे सुजान नागरीक आहेत.दैनंदिन जीवनात इतर गोष्टींमध्ये तडजोड करा मात्र, पाल्यांच्या शिक्षणासाठी कोणतीही तडजोड न करता पालकांनी त्यांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याचे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज येथे केले.जिल्हा परिषद कन्या शाळेला सुविधांसाठी शासनाच्यावतीने पूर्ण सहकार्य करण्यात येईल असे सांगत प्रत्येक वर्गात गुणानुक्रमे येणाऱ्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून १ लाख रुपयांचा निधीही त्यांनी शाळेसाठी जाहीर केला.स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमानंतर शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेला भेट दिली यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हाधिकारी आशिष





#### जिल्हा परिषद कन्या शाळेत देशभक्ती गीतांवर विद्यार्थिनीं सादर केल्या उत्कृष्ट कवायती गुणवंत विद्यार्थिनींना उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून १ लाखांचा प्रोत्साहन निधी जाहीर

येरेकर, जिल्हा परिषदेचे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सिद्धेश्वर काळुसे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रिया देशमुख, जिल्हा परिषद कन्या शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण आंधळे आदी यावेळी उपस्थित होते.मंत्री श्री. भुसे म्हणाले, या शाळेत गुणात्मक शिक्षणासह मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जातात व सैनिकी प्रशिक्षणही दिले जात असल्याची बाब कौतुकास्पद आहे. मुलींच्या कला व क्रीडा गुणांनाही प्राधान्य देण्यात येत आहे ही समाधानाची बाब आहे. शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर आहे. यासोबतच शाळेतील अन्य आवश्यक सुविधांसाठी शासनातर्फे पूर्ण मदत करण्यात येईल. शाळांमधून चांगले संस्कार व गुणात्मक शिक्षण मिळते व यातूनच देशाचे सुजान नागरीक घडतात म्हणून पालकांनी कोणतीही तडजोड न करता पाल्यांना शिकवावे असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही चांगला अभ्यास करून आई–वडिल, गुरुजन,कुटुंब,गाव,राज्य व देशाचे नाव उज्ज्वल करावे, असा संदेशही त्यांनी दिला. कन्या शाळेतील गुणवंत विद्यार्थीना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून १ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगितले.तत्पूर्वी, विद्यार्थीनी 'बलसागर भारत होवू विश्वात शोभूनी राहू, 'मेरा देश मेरा मुल्क मेरा ये वतन' अशा एकानेक देशभक्ती गींतावर सुंदर कवायती सादर केल्या.

विविध परीक्षांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या व विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या श्रावणी सोनोने,जाणीव नंदेश्वर, अंतरा वाट, अनुष्का सूर्यवंशी या विद्यार्थीनीचा यावेळी मंत्री भुसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गजानन पवार ,सुदाम वानखडे आणि श्रीराम मकेश्वर या माजी सैनिकांचा तसेच शाळेचे माजी मुख्याध्यापक नारायणराव वानखडे यांचाही सत्कार करण्यात आला.

वंदेमातरम व राष्ट्रीगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### जिल्हा परिषद शाळेतील भ्रष्टाचाराच्या तक्रारीवर कारवाई नाही

## तरुणाचे पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ ,उत्तमसरा**

जिल्ह्यातील उत्तमसरा गावात जिल्हा परिषद शाळेतील कथित भ्रष्टाचाराच्या तक्रारीवर प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याचा आरोप करत अभिषेक सवई या तरुणाने पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. संबंधित प्रकरणाची तक्रार करूनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप त्याने केला आहे.शाळेतील विविध कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा दावा करत सवई यांनी यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. मात्र, तक्रारीनंतरही ठोस कारवाई होत नसल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले.या आंदोलनादरम्यान सवई यांनी आत्मदहनाचा इशाराही दिल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व संबंधित यंत्रणेतील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांना खाली उतरविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.दरम्यान, जिल्हा परिषद शाळेतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी सवई यांनी केली आहे. प्रशासन आता या तक्रारीची कोणती दखल घेते आणि चौकशीनंतर काय कारवाई होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामसभा न घेतल्याने पळसखेडमध्ये नागरिक आक्रमक; ग्रामपंचायतीला ठोकले कुलूप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील पळसखेड येथे स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी नियोजित ग्रामसभा न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली. दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभा घेण्याची परंपरा असताना यंदा ग्रामसभा आयोजित करण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयात एकत्र येत आक्रमक भूमिका घेतली.ग्रामसभा होणार असल्याने अनेक नागरिक सकाळपासून ग्रामपंचायत कार्यालय परिसरात उपस्थित झाले होते. मात्र, ग्रामसेवक तसेच सरपंच यांच्यापैकी कोणीही उपस्थित न राहिल्याने ग्रामस्थांचा संताप वाढला. अखेर नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकत निषेध नोंदविला. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयातील टेबल–खुर्च्याही बाहेर काढण्यात आल्या.गेल्या तीन ते चार महिन्यांपासून ग्रामपंचायतीमध्ये



ग्रामसभा घेण्यात आलेली नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून गावातील विकासकामे, निधीचा वापर, विविध योजनांची अंमलबजावणी आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत नागरिकांना माहिती मिळणे अपेक्षित असते. मात्र, ग्रामसभा न घेतल्याने गावकऱ्यांना प्रश्न विचारण्याची आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा हिशोब मागण्याची संधी मिळत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.ग्रामपंचायतीच्या कारभारात अनेक गैरप्रकार व भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. या आरोपांबाबत ग्रामसेवकांकडून ग्रामसभेत खुलासा होणे आवश्यक असताना ग्रामसभा घेतली जात नसल्याचा दावा नागरिकांनी केला. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.दरम्यान, ग्रामसभा न घेतल्याच्या मुद्द्यावरून ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनामुळे पळसखेडमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये असलेला रोष या आंदोलनातून स्पष्टपणे समोर आला आहे.

# पावसाळी पर्यटनाचा आनंद भोवला!

## दोन विद्यार्थिनी जलाशयात बुडाल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ यवतमाळ**

पावसाळी पर्यटनाचा आनंद यवतमाळमधील दोन कुटुंबासाठी आयुष्यभराचे दुःखाश्रू ठरला आहे. निसर्गाचे सौंदर्य अनुभवण्यासाठी बोरगाव धरणावर गेलेल्या दोन तरुण विद्यार्थिनींचा धरणाच्या जलाशयात बुडून दुर्दैवी अंत झाला. पाण्यात घसरलेल्या मैत्रिणीला वाचवण्याच्या धाडसी, पण दुर्दैवी प्रयत्नात दुसऱ्या विद्यार्थिनीलाही आपला प्राण गमवावा लागला. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण यवतमाळवर दुःखाचा डोंगर कोसळला. अमृता अशोक खेडकर (२०, रा. महात्मा फुले कॉलेज समोर, धामणगाव रोड) आणि मोहिनी गौत्रे (२०, रा. भोसा रोड) अशी या मृत विद्यार्थिनींची नावे आहेत. दोन्ही तरुणी यवतमाळ येथील वाधवानी फार्मसी महाविद्यालयात शिक्षण घेत होत्या. दुपारी चार वाजेच्या सुमारास अमृता आणि मोहिनी आपल्या काही वर्गमित्रांसोबत यवतमाळ नजीकच्या



बोरगाव धरणाच्या परिसरात फिरण्यासाठी गेल्या होत्या. पावसाळ्याच्या दिवसांत चहूकडे पसरलेली हिरवळ आणि भरलेले धरण यामुळे हा परिसर पर्यटकांना आकर्षित करतो. सर्व मित्र–मैत्रिणी निसर्गाचा आनंद लुटत असताना अमृता आणि मोहिनी धरणाच्या काठावर अगदी पाण्याच्या जवळ गेल्या. मात्र, पाण्याचा आणि काठावरील निसरड्या भागाचा अंदाज न आल्याने अमृताचा अचानक पाय घसरला आणि ती थेट खोल पाण्यात कोसळली. आपली मैत्रीण डोळ्यांसमोर पाण्यात बुडत असल्याचे दिसताच मोहिनीने क्षणाचाही विलंब न लावता तिला वाचवण्यासाठी हात पुढे केला. परंतु, पाण्याचा तीव्र प्रवाह, काठावरील चिखल आणि अमृताला बाहेर काढताना झालेली ओढाताण यामुळे मोहिनीचाही तोल गेला. काही क्षणांतच दोघीही खोल पाण्यात खेचल्या गेल्या. त्यांच्यासोबत आलेल्या एका युवकाने प्रसंगावधान राखून तातडीने पाण्यात उडी घेतली. त्याने दोघींपर्यंत पोहोचून त्यांना बाहेर काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, पाण्याचा अथांग तळ आणि दोघींचे वजन यांमुळे त्या युवकाचे प्रयत्न अपुरे पडले. स्वतःचा जीव वाचवत अखेर त्याला हतबल होऊन काठावर परतावे लागले.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला
आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :